# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 12/10/2023 (गुरूवार) दुपार


## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## पोलीस स्टेशन देवलापारची कार्यवाही

दिनांक ११/१०/२०२३ रोजी पोलीस स्टेशन देवलापार येथील स्टाफ देवलापार हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे देवलापार हद्दीतील बोथीया पालोरा फाटा येथे अवैधरीत्या विनापरवाना रेतीची ट्रॅक्टर व्दारे चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून पोलीस स्टेशन देवलापार येथील स्टाफ यांनी बोथिया पालोरा फाटा येथे नाकाबंदी करून ट्रॅक्टर क्र. एम. एच.— ४० ए. एम २३१९ च्या चालकाला थांबवून तपासले असता सदर वाहनात ट्रॅक्टर चालक **आरोपी नामे— अजय नागेश्वर वाढीवे, वय २१ वर्ष, रा. गुगुलडोह ता. रामटेक हा** ट्रॅक्टरमध्ये विनारॉयल्टी अवैधरीत्या रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने त्याच्या ताब्यातून १) ट्रॅक्टर क्र. एम एच ४०/ ए. एम २३१९ अंदाजे किंमती ४,००,०००/—रु. ज्यामध्ये एक ब्रास रेती किंमती ३,०००/— रु. असा एकुण किंमती ४,०३,०००/—रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पोलीस नायक विजय परमेश्वर पोस्टे देवलापार यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. पुढील तपास पोलीस नायक विजय परमेश्वर पोस्टे देवलापार मो. नं. ९६२३३०८७३१ हे करीत आहे.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर